सकाळ TODAY

## दृष्टिक्षेपात



**गडहिंग्लज : नूतन डीवायएसपी गणेश इंगळे यांचे स्वागत करताना एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. दत्ता पाटील, संदीप कागवाडे, महेश मजती, बाबासाहेब मार्तंड.**

# पोलिस उपअधीक्षक इंगळे यांचा सत्कार

**गडहिंग्लज :** गडहिंग्लजचे नूतन डीवायएसपी गणेश इंगळे यांचे श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी व झेप अॅकॅडमीतर्फे स्वागत करण्यात आले. दोन्ही संस्थांचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते श्री. इंगळे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी रवळनाथचे संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, झेपचे कार्याध्यक्ष डॉ. दत्ता पाटील, सचिव संदीप कागवाडे, खजिनदार महेश मजती, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड उपस्थित होते. चौगुले यांनी शासकीय-निमशासकीय नोकरदारांसाठी सहकारी तत्त्वावर सुरू केलेल्या रवळनाथ हौसिंग फायनान्स आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी सुरू केलेल्या झेप अॅकॅडमीची माहिती दिली. उदात्त हेतू व सामाजिक बांधिलकीतून काम करणाऱ्या दोन्ही संस्थांच्या वाटचालीबद्दल इंगळे यांनी समाधान व्यक्त केले.

# रवळनाथकडून डीवायएसपी गणेश इंगळे यांचे स्वागत



गडहिंग्लज : नूतन डीवायएसपी गणेश इंगळे यांचे स्वागत करताना रवळनाथचे अध्यक्ष एम.एल. चौगुले यांच्यासह अन्य.

प्रतिनिधी
गडहिंग्लज

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व ज्ञानदीप प्रबोधनी संचलित झेप ॲकॅडमीच्या वतीने गडहिंग्लजचे डीवायएसपी गणेश इंगळे यांचे स्वागत करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

यावेळी चौगुले यांनी शासकीय-निमशासकीय नोकरदारांसाठी सहकारी तत्वावर सुरु केलेल्या रवळनाथ हौसिंग सोसायटी आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी सुरु केलेल्या झेप ॲकॅडमीविषयी माहिती दिली. सामाजिक बांधिलकीतून काम करणाऱ्या दोन्ही संस्थांच्या वाटचालीबद्दल डीवायएसपी इंगळे यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी श्री. चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. डीवायएसपी श्री. इंगळे यांनी दोन्ही संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले. संस्थेचे संचालक डॉ. दत्ता पाटील, संदीप कागवाडे, महेश मजती, पीआरो बाबासो मार्तंड यांच्यासह अन्य उपस्थित होते.